# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

**अभिवेदन (Representation) क्रमांक ९५ / २०२२**

**उस जळीत प्रकरणी नुकसान भरपाई मिळण्याबाबत व रोहीत्र व लाईन नवीन जागी स्थलांतरीत करण्याबाबत**

शिवराम मारुती वाडेकर ............ .................................................................................................. अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, राजगूरूनगर (महावितरण) ........................... ........... ........... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- शिवराम मारुती वाडेकर
संदिप शिवराम वाडेकर

प्रतिवादीतर्फे :- मनीष ठाकरे, कार्यकारी अभियंता, राजगुरूनगर विभाग
विजय गारगोटे, उपकार्यकारी अभियंता, चाकण उपविभाग

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- ६ ऑक्टोंबर २०२२

आदेश पारित दिनांक :- १८ ऑक्टोंबर २०२२

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, पुणे परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक ३ मे २०२१ च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १७ जून २०२२ रोजी दाखल केले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

२. मंचाने तक्रारदार यांचे अभिवेदन क्रमांक ५/२०२१, दिनांक ३ मे २०२१ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

*महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम 2020 (ग्राहक गाऱ्हाणे विनियम 2020)*

*"७. गाऱ्हाणे सादर करण्याची आणि स्वीकारण्याची पध्दती.*

*७.१ मंच खालील स्थितीत कोणत्याही टप्प्यावर गाऱ्हाणे नाकारेलः*

*बी अधिनियमाच्या कलम १२६, १२७, १३५ ते १३९, १५२ आणि १६१ खाली येणारी प्रकरणेः*

*परंतू असे की, तक्रारदाराला त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणतेही गाऱ्हाणे नाकारण्यात येणार नाही.*

*या कारणास्तव अर्ज निकाली काढण्यात येत आहे."*

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातोल व दिनांक ६ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे मौजे बहूळ, तालूका खेड, जिल्हा पुणे येथील महावितरणचे कृषी ग्राहक आहेत. त्याच्या मालकीच्या ३ एकर शेतजमीनीमध्ये ते ऊसाचे उत्पन्न घेतात. अपिलार्थीच्या शेतजमीनीमधून वीज पुरवठा करणारे रोहित्र बसविण्यात आले आहे व वीजेची लाईन शेतातून जात आह.
- दिनांक ६ सप्टेंबर २०20 रोजी एचटी लाईनमधला एक फेज पिन इन्सुलेटरवरून सरकला. त्यामुळे पिन इन्सुलेटरचा क्रॉस आर्म व लाईव्ह फेज यामध्ये शॉर्ट सर्किट होऊन वीजेच्या ठिणग्या पडून आग लागली. त्यामुळे अपिलार्थीच्या ऊस पिकाचे अंदाजे रु.४,५०,000/- (रु.चार लाख पन्नास हजार फक्त)) चे नुकसान झाले.
- या पर्वीही अनेक वेळा अपिलार्थीच्या शेतजमीनीमधील महावितरणच्या वीज खांबावर शॉर्ट सर्कीट होऊन तसेच रोहीत्रामुळे शेतातील ऊस जळून अपिलार्थींचे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.
- सदर वीजखांब व रोहित्राची जागा बदलण्यासाठी अपिलार्थीने दिनाक ३ जुलै २०१८ रोजी व दिनांक ५ डिसेंबर २०१८ रोजी अर्ज केला. सदरहू अर्जाचा वेळोवेळी पाठपूरावा करूनही

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

त्यावर महावितरणे कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. परीणामी अपिलार्थीचे पुन्हा एकदा आर्थिक नुकसान झाले.

- अपिलार्थीने दिनांक ३० नोव्हेंबर २०२० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षामध्ये तक्रार दाखल केली. कक्षाने दिनांक ६ जानेवारी २०२१ च्या आदेशाने अभिवेदन निकाली काढताना अपिलार्थीच नुकसान भरपाई मंजूरोबाबतचे प्रकरण प्रगतीपथावर आहे, याची नोंद घेतली. सदर गाऱ्हाणे ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२० च्या विनियमात येत नसल्यामुळे कक्षाने सदर गाऱ्हाणे निकाली काढले.
- अपिलार्थीने दिनांक ८ फेब्रुवारी २०२१ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक ३ मे २०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर गाऱ्हाणे ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२० अधिनियम २ मधील 'गाऱ्हाणे' या व्याख्येत येत नसल्यामुळे विनियम ७ नुसार फेटाळून लावले.
- अपिलार्थीने मंचाच्या आदेशाने समाधान न झाल्याने विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयामध्ये दिनांक १७ जून २०२२ रोजी अभिवेदन दाखल केले. अपिलार्थीने ऊसाच्या पिकाचे नुकसान भरपाई म्हणून रु.चार लाख पन्नास हजार मिळावेत व शेतजमीनीवरील वीजेचे खांब व रोहित्राची जागा हलविण्यात यावी अशी विनंती अभिवेदनात केली आहे.

४. प्रतिवादी महावितरणने अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ६ सप्टेंबर २०२२ च्या उत्तरात नमुद केलेले व दिनांक ६ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणेः

- दिनांक ६ सप्टेंबर २०२० रोजी एचटी लाईनमधला एक फेज पिन इन्सुलेटरवरून सरकला. त्यामुळे पिन इन्सुलेटरचा क्रॉस आर्म व लाइव्ह फेज यामध्ये शॉर्ट सर्कीट झाल्यामुळे वीजेची ठिणग्या पडून आग लागली. अपिलार्थीचे उस जळून त्याचे आर्थिक नुकसान झाले. त्यावर प्रतिवादी महावितरणकडुन नियमानूसार योग्य ती कार्यवाही केली आहे व उर्वरीत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
- वीज जळीत अपघात घडल्यानंतर महावितरण चाकण उपविभागाने विद्युत निरिक्षक, विद्युत निरिक्षण विभाग यांना दिनांक २८ ऑक्टोबर २०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर विद्युत निरिक्षकाने अपघात स्थळाची पहाणी कली व वीज जळीत प्रकरणाचा अहवाल दिनांक २८ ऑक्टोबर २०२० रोजीचा असून राजगुरूनगर विभागिय कार्यालयास दिनांक ३ नोव्हेंबर

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२०20 रोजी प्राप्त झाला. वीजेच्या शॉर्ट सर्कीटमुळे ऊस जळीत अपघात झाल्याचे अहवालात नमुद करण्यात आले.

- मे. चेअरमन शुगर फॅक्टरीला दिनांक २६ नोव्हेंबर २०20 च्या पत्रान्वये विचारणा केली की, अंदाजे किती नुकसान झाले आहे व शासनामार्फत कोणत्या प्रकारचे अनुदान दिले / किंवा नाही याचा तपशील इ. माहिती याचा अहवाल द्यावा जेणेकरून संबधितास नुकसान भरपाई देता येईल. तथापि, सदरहू अहवाल प्राप्त झाला नाही.
- मा. तहसिलदार, खेड, जिल्हा पुणे व तालूका कृषी अधिकारी दिनांक २६ नोव्हेंबर २०20 पत्रान्वये विचारणा केली आहे की, अंदाजे किती ऊस जळालेला आहे. त्याचे अंदाजपत्रक द्यावे व शासनामार्फत कोणत्या प्रकारचे अनुदान दिले आहे/नाही याचा तपशिल व इतर माहिती याचा विस्तृत अहवाल द्यावा जेणेकरून अपिलार्थीस नुकसान भरपाई देता येईल.
- वरील प्रमाणे सर्व संबधिताना या विषयी कळविले असून त्याचा पाठपुरवाही सुरू आहे, तसेच याबाबतचे महावितरणकडून देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून सक्षम अधिकाऱ्याकडे मजूरीसाठी पाठविण्यात आला आहे.
- रोहीत्र व त्यालगतचे खांब स्थलातरींत करण्याबाबतचे अंदाजपत्रक महावितरणने स्वतः बनविले व सदर अदाजपत्रक सक्षम अधिकाऱ्यांकडे पाठवून मंजूरी घेण्यात आली. अंदाजपत्रकानूसार वीज रोहीत्र व त्यालगतचे पोल स्थलातरींत करण्यात आले. त्या ठिकाणी नवीन पोल बसविण्यात आले. पूर्वीच्या जागेत असलेले निकामी पोल काढावयाचे राहीले आहेत. सदर शेतात पीक असल्यामुळे निकामी पोल काढण्यात आलेले नाहीत. परंतू पुढील तीन महिन्याच्या आत निकामी पोल काढण्यात येतील.
- प्रतिवादींनी ऊस जळीत नुकसान भरपाईचे प्रकरण सक्षम अधिकाऱ्याकडे पाठविलेले असल्याने व रोहीत्र स्थलांतरीत करण्याचे काम केले असल्यामुळे अपिलार्थीचे अभिवेदन निकाली काढण्यात यावे.
- प्रतिवादीने नमुद केले की, मंचाचे आदेश दिनांक ३ मे २०२१ रोजीचे आहेत. अपिलार्थींनी ६0 दिवसाच्या आत विद्युत लोकपाल यांच्याकडे विनियम १९.१ अन्वये येणे अपेक्षीत होते तथापि अपिलार्थींनी हे अभिवेदन दिनांक १७ जून २०२२ रोजी दाखल केले. १३ महिन्यापेक्षाही जास्त कालावधीत अभिवेदन दाखल करण्यास उशीर झाल्यामुळे, सदर अभिवेदन रद्दबादल करण्यात यावे. तसेच ह अभिवेदन गाऱ्हाण्याच्या व्याख्येत बसत नाही, म्हणून सर्व बाबीचा विचार करून अपिलार्थीचे अभिवेदन नाकारण्यात यावे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

**विश्लेषण व निर्णय**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. मंचाच्या दिनांक ३ मे २०२१ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थींनी दिनांक १७ जून २०२२ रोजी अभिवेदन दाखल केले. २ महिन्यात अभिवेदन दाखल करणे अभिप्रेत होते, अपिलार्थीने ते दाखल करण्यासाठी १३ महिन्यापेक्षाही अधिक कालावधी घेतला. (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ ची तरतूद खालीलप्रमाणे.

> *"१९.१ मंचाकडून गाऱ्हाण्याचे निवारण न झाल्याने बाधित झालेल्या ग्राहकाला, थेट किंवा उचित प्रतिनिधीच्या माध्यमातून, मंचाच्या आदेशाच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसाच्या आत, गाऱ्हाण्याच्या निवारणासाठी विद्युत लोकपालाकडे अभिवेदन सादर करता येईल.*
>
> *परंतु असे की, सदर कालावधीत अभिवेदन दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत जर विद्युत लोकपालाची खात्री झाली तर साठ (६०) दिवसांचा कालावधी संपून गेल्यावर तो असे अभिवेदन विचारार्थ स्वीकारू शकेल."*

सबब, सदर अभिवेदन विनियानुसार विचारार्थ स्वीकारू शकत नाही.

७. अपिलार्थीने अभिवेदनात नमुद केले की, अपिलार्थीच्या हे ऊसाचे ३ एकर शेतजमीनीमध्ये ऊसाचे उत्पन्न घेतात. अपिलार्थीच्या शेतजमीनीमधून वीज पुरवठा करणारे रोहीत्र बसविण्यात आले आहे व वीजेची लाईन शेतातून जात आहे. दिनांक ६ सप्टेंबर २०२० रोजी शॉर्ट सर्कीट झाल्यामुळे वीजेच्या ठिणग्या पडून आग लागली. त्यामुळे अपिलार्थीच्या ऊस पिकाचे अंदाजे रू.४,५०,०००/- चे नुकसान झाले. सदर वीजखांब व रोहीत्राची जागा बदलण्यासाठी अपिलार्थीने दिनाक ३ जुलै २०१८ रोजी व दिनांक ५ डिसेंबर २०१८ रोजी अर्ज केला. सदरहू अर्जाचा वेळोवेळी पाठपूरावा करूनही त्यावर महावितरणने कोणतीही ठोस पावले उचलली नाही. परीणामी अपिलार्थीचे पुन्हा एकदा आर्थिक नुकसान झाले.

८. प्रतिवादीने असे नमुद केले की, दिनांक ६ सप्टेंबर २०२० रोजी एचटी लाईनमधला एक फेज पिन इन्सुलेटरवरून सरकला. त्यामुळे पिन इन्सुलेटरचा क्रॉस आर्म व लाइव्ह फेज यामध्ये शॉर्ट सर्कीट

झाल्यामुळे वीजेची ठिणग्या पडून आग लागली. अपिलार्थीचे ऊस जळून त्याचे आर्थिक नुकसान झाले. त्यावर प्रतिवादी महावितरणकडुन नियमानूसार योग्य ती कार्यवाही केली आहे व उर्वरीत कार्यवाही प्रगतीपथावर आहे. रोहीत्र व त्यालगतचे पोल स्थलातरींत करण्याबाबतचे अंदाजपत्रक महावितरणने बनविले व सदरहू अंदाजपत्रक सक्षम अधिकाऱ्यांकडे पाठवून मंजूरी घेण्यात आली. अंदाजपत्रकानूसार वीज रोहीत्र व त्यालगतचे पोल स्थलातरींत करण्यात आले. त्या ठिकाणी नवीन पोल बसविण्यात आले. पुर्वीच्या जागेत असलेले निकामी पोल काढावयाचे राहीले आहेत. सदरहू शेतात पीक असल्यामुळे निकामी पोल काढण्यात आलेले नाहीत. परंतू पुढील तीन महिन्याच्या आत निकामी पोल काढण्यात येतील. प्रतिवादींनी ऊस जळीत नुकसान भरपाईचे प्रकरण सक्षम अधिकाऱ्याकडे पाठविलेले असल्याने व रोहीत्र स्थलांतरीत करण्याचे काम केले. ग्राहक गाऱ्हाणे विनियम, २०२० मधील विनियम २(इ) नुसार "गाऱ्हाणे" ची व्याख्या खालीलप्रमाणे आहे :-

> *"गाऱ्हाणे" म्हणजे एखादया वितरण परवानेधारकाचे परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा विद्युत पुरवठा संहिता विनियमातर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वितरण परवानाधारकांच्या कृतीच्या मानकांच्या संबधास पार पाडण्यासाठी हमी दिलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरूप, ती पार पाडण्याची पध्दत, यामधील कोणताही दोष, अपुर्णता, त्रुटी किंवा अपूरेपणाः ज्यात इतर बांबीबरोबरच आयोगाने दिलेला कोणताही आदेश किंवा त्याच्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कृती, याची पुर्तता न होण्याबाबतच्या गाऱ्हाण्याचा समावेश होतो, जे मंच किंवा विद्युत लोकपालाच्या अधिकारक्षेत्राखाली येत, जसे असेल तसे."*

अपिलार्थींची ऊस जळीत नुकसान भरपाईची व रोहीत्र स्थलांतरीत करण्याची तक्रार ग्राहक गाऱ्हाणे विनियम, २०२० मधील 'गाऱ्हाणे' च्या व्याख्येत बसत नाही. मंचाने या सर्व बाबीचा उहापोह, त्यांच्या आदेशात योग्यरित्या केलेला आहे. सबब, मंचाच्या आदेशात कोणताही बदल करण्याची गरज वाटत नाही.

९. सबब, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत आहे व अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.